**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उदय भोजराज टोणे
सुधा निवास, स्टेशन रोड, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, अक्कलकोट एज्युकेशन
ज्युनिअर कॉलेज, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स,
राजा विजयसिंह कॉमर्स अॅण्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३२+ ८७१ / सोलापूर /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.सी.खेडगी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स,
राजा विजयसिंह कॉमर्स अॅण्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.जी.एस.हारकूड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ व २७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

संस्थेची नेमणूक, सेवा सलगता आदी संदर्भात सन १९८८ पासूनची माहिती अपीलकर्ता श्री.उदय भोजराज टोणे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स ॲण्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती अपूर्ण व चुकीची दिली असल्याची तक्रार त्यांनी अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली.

'श्री.यु.बी.टोणे यांनी वेळोवेळी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सी.बी.खेडगीजृ बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स ॲण्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर व अपिलीय अधिकारी तथा सचिव, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांनी वेळोवेळी माहिती दिलेली आहे.' श्री.टोणे यांना आरक्षित पदावर तात्पुरती नेमणूक दिली होती. पद पूर्ण वेळ झाल्यानंतर आरक्षित झाले. श्री.टोणे आरक्षित नसल्यामुळे त्यांना कमी करण्यात आले. तेव्हापासून विविध स्वरूपाची माहिती मागणारे सात-आठ अर्ज त्यांनी केले असून त्या त्या वेळी पूर्ण माहिती त्यांना दिली आहे. तसेच शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग, पुणे, मुंबई उच्च न्यायालय येथे त्यांनी केलेले

अपील फेटाळण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स ॲण्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.एस.सी.हारकूड यांनी नमूद केले. दिलेली माहिती, शाळा न्यायाधिकरणाने व उच्च न्यायालयाने दिलेले निकाल यांच्या प्रती त्यांनी सादर केल्या. त्यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.सी.खेडगी यांनी सांगितले. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्त्याचे अन्य आक्षेप ही प्रशासकीय कार्यवाहीविषयक बाब असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.२६.२.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ऑकारसिंह गुलाबसिंह पाटील
नाओ, २७, यशवंत कॉलनी,
विसावा कँम्प, सातारा ४१५ ००१ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी सातारा,
जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** चिटणीस (महसूल शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७३/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.ऑकारसिंह गुलाबसिंह पाटील<br>नाओ, २७, यशवंत कॉलनी,<br>विसावा कँम्प, सातारा ४१५ ००१ | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.३.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.६.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

मोबाईल टॉवर करा संबंधीच्या नियमावलीच्या व शासन आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा यांच्या पातळीवरुन उपलब्ध झाल्या नाहीत.

अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा यांनी अपील मान्य करुनही जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्याकडून माहिती मिळाली नाही. मोबाईल टॉवरवरील दंड आकारणीबाबत शासनयंत्रणेत सुसूत्रता दिसत नाही. रु.३,०००/- पासून रु.१,३७,०००/- पर्यंत दंड केल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे त्याबाबतचे नेमके नियम स्पष्ट होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.ओंकारसिंह गुलाबसिंह पाटील यांनी केले. संबंधित आदेशाच्या नियमावलीच्या प्रती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे श्री.पाटील यांना पूर्वीच कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी लेखी निवेदनात नमूद केलेले आहे. मात्र त्यांचे हे स्पष्टीकरण मान्य करता येणार नाही. नियमावली उपलब्ध नसेल, तर दंड आकारणी कोणत्या आधारावर केली जाते. हे नागरिकांना कळणे हा त्यांचा हक्क आहे. त्यामुळे संबंधित नियमावलीच्या / आदेशाच्या प्रती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यांस देणे आवश्यक आहे. अशी नियमावली नसल्यास दंड आकरणीबाबतचे आधारभूत सूत्र स्पष्ट केले पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील मान्य.

२) अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जानुसार आवश्यक असलेल्या नियमावलीच्या व आदेशाच्या प्रती प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी दि.३१.०३.२०१० पर्यंत अपीलकर्त्यांस नि:शुल्क पुरवाव्या. अशी नियमावली नसल्यास मोबाईल टॉवरवरील दंड आकारणी कशाच्या आधारे केली जाते, त्याबाबतचे सूत्र काय आहे, याची स्पष्ट माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा यांनी अपीलकर्त्यांस या मुदतीत पुरवावी, व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 26 FEB 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

१.श्री. भिमराव धोंडी थोरात
२.श्री.आनंदराव रामचंद्र जाधव
मु. पो. सैदापुर, ता.कराड, जि.सातारा
३.श्री.उत्तमराव गणपतराव दसवंत
२००(५४४) गणू विहार, मंगळवार पेठ, कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९४+७९५+७९६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** १.श्री. भिमराव धोंडी थोरात
२.श्री.आनंदराव रामचंद्र जाधव
मु. पो. सैदापुर, ता.कराड, जि.सातारा
३.श्री.उत्तमराव गणपतराव दसवंत
२००(५४४) गणू विहार, मंगळवार पेठ, कराड, जि.सातारा

| | |
|---|---|
| **अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग,<br>साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ श्री.डी.आर.घोडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि.,<br>यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा श्री.सी.एन.अहिरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या काही खर्चाबाबतची दि.१ एप्रिल १९९५ ते ३१ मार्च १९९६ या काळातील माहिती आपण मागितली होती. परंतु दोन हॉटेलांमधील खर्चाबाबतची माहिती दिली नाही. तसेच कारखान्याच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती व अर्जाला उत्तर दिले नाही. आपला साखर कारखाना हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, असा दावा कारखान्याने अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे केला होता. सह्याद्री सहकारी साखर कारखाना हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरतो, त्यामुळे विहित शुल्क आकारून अपीलकर्त्यांना माहिती १५ दिवसांत द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी देऊनही जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा यांनी माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ते श्री.भिमराव धोंडी थोरात, श्री.आनंदराव रामचंद्र जाधव व श्री.उत्तमराव गणपतराव दसवंत यांनी केले.

तीनही अपीलकर्त्यांनी एकच माहिती मागितली असून कारखान्याला त्रास देणे व कारखान्याची बदनामी करणे अशी त्यामागील भूमिका आहे. सन १९८८ पासून अपीलकर्ते व त्यांचे सहकारी अशा प्रकारे अर्ज, अपिले, पत्रव्यवहार करीत आले आहेत. त्यामागे राजकीय हेतू आहे. तरीही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, कलम ३२ अन्वये सहकारी संस्थेच्या

सभासदांना माहिती देण्यात येते व अपीलकर्ता हे सभासद असल्यामुळे त्यांनी त्यानुसार अर्ज केल्यास माहिती देण्यात येईल, असे त्यांना कळविले होते. आपल्या साखर कारखान्याला शासनाचे भागभांडवल नाही. शासनाने दिलेले भागभांडवल सन १९९६ मध्येच पूर्णपणे परत केलेले आहे. अन्य शासकीय मदत कर्जाच्या स्वरूपाची असून त्याचीही परतफेड केलेली आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार आपला कारखाना हे सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा श्री.सी.एन.अहिरे यांनी केले.

ऊस खरेदी कर (रू.५०२.०४ लाख) हे शासनाने कारखान्याला ऊस खरेदी करात सवलत देऊन दिलेले कर्ज आहे. या व्यतिरिक्त ओएनबी (outsider marketing borrowing) कर्ज रू.१३६२.०९ लाख हे सवलतीच्या दरात शासनाने केलेले अर्थसहाय्य आहे. सीकॉम कडून दिलेल्या कर्जाला शासनाने अर्थसहाय्य केलेले आहे. शिवाय कारखान्याला राज्य व केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या योजनाअंतर्गत साखर निर्यात अनुदानासारखे परतफेड न करण्याचे कायमस्वरूपी अर्थसहाय्य देण्यात आले आहे. तसेच साखर आयुक्तांचे कारखान्यावर पूर्ण नियंत्रण असते. या बाबी लक्षात घेता कारखाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.आर.घोडे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा यांनी अपीलकर्त्यांच्या अर्जास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तथापि अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही माहिती दिलेली नाही. कारखान्याला मिळणाऱ्या शासकीय अर्थसहाय्याबाबत उभय बाजूंनी परस्परविरोधी दावे केलेले आहेत व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निष्कर्षानुसार अर्थसहाय्य मिळत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात वस्तुस्थिती नेमकेपणाने स्पष्ट होणे आवश्यक आहे. कर्जाची परतफेड केली

असल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (एच) मध्ये नमूद केल्याप्रमणे भरीव अर्थसहाय्य म्हणता येणार नाही. तीनही अपीलकर्त्यांनी सारखेच अर्ज केले असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ३२ नुसार माहिती देणे कारखान्यावर बंधनकारक असताना त्याअन्वये अर्ज केलेला नाही, याचीही नोंद घेण्यात येत आहे.

वरील बाबी लक्षात घेता सह्याद्री सहकारी साखर कारखान्याबाबत भागभांडवल, शासकीय सवलती, अन्य स्वरूपाचे अर्थसहाय्य, कर्जाला हमी, अडचणीच्या काळातील मदत आदी तपशील स्पष्ट होणे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार हा कारखाना सार्वजनिक प्राधिकरण ठरतो की नाही, याच्या निर्णयासाठी आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) सह्याद्री सहकारी साखर कारखान्याला शासनाने दिलेले भागभांडवल, शासकीय सवलती, अन्य स्वरूपाचे अर्थसहाय्य, कर्जाला हमी, अडचणीच्या काळातील मदत आदी तपशील प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी १०.३.२०१० पर्यंत त्यांच्या अभिप्रायासह आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विजयकुमार शिवाजी भुसारे
मु.पो.मालेगाव,ता. बार्शी,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, बार्शी,
जिल्हा. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
मालेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.,मालेगाव,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९.१०.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.०१.२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.०२.२००८ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>दारिद्रय रेषेखालील योजनेतंर्गत विद्युत मोटार व पाईप लाईनसाठी घेतलेल्या कर्जाच्या खात्याचा तपशील, व्याजदर आकारणी, परतफेड इ. माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ०७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' उभय घटकामध्ये झालेल्या एकमतानुसार जन माहिती अधिकारी तथा सचिव, मालेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि., मालेगाव यांना अपीलकर्ता श्री.भुसारे यांना दि. ११.१०.२००८ रोजी

समक्ष माहिती दिली, असे अपीलकर्त्याची पोच असलेल्या पत्रासह जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केल आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री सुरेश बाबुराव इंगळे
मु. पो. कुर्डुवाडी, नवलेचाळ,माढा रोड,
ता. माढा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
बार्शी विभाग, बार्शी, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.६.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.६.२००६ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>महावितरण कंपनीकडून केल्या जाणा-या विजपुरवठयाशी सबंधित स्थिर आकार, विज शुल्क, इंधन अधिभार इ. संज्ञाचे स्पष्टीकरण तसेच इलेक्ट्रानिक विज मीटरच्या अनुषंगाने माहिती. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यास अपीलकर्ते गैरहजर होते. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण कंपनी, कुर्डुवाडी

यांनी दि. ३०.६.२००६ रोजी दिलेली माहिती योग्य आहे. तसेच सदर प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. भिमराव लक्ष्मण पवार
रा. अंधळगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर ... अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. भिमराव लक्ष्मण पवार
रा. अंधळगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर, ता. पंढरपूर,
जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. यु. के. कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा, ता. मंगळवेढा,
जि. सोलापूर श्री. एस. सी. गस्ते

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. | १४.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २४.४.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते, त्यामुळे दि. ३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे अंधळगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील विकास कामांच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा, ता. मंगळवेढा यांच्याकडे आपण मागितली होती. स्मरणपत्र देऊनही त्यांनी अर्जाला उत्तर दिले नाही. दोन टप्प्यामध्ये माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मान्य करूनही पूर्ण माहिती दिलेली नाही. अभिलेख अवलोकनास येण्यासाठी आपणास सांगितले. आपण दारिद्र्य रेषेखालील यादीत असून कागदपत्रे पाहण्यासाठी गेलो असता लिपिक हजर नसल्याच्या कारणावरून अन्य दिवशी येण्यास सांगितले जाते. माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत असून अपील काढून टाकण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा दबाव आणत आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. भिमराव लक्ष्मणराव पवार यांनी केले.

श्री. पवार यांनी सन २००५ ते २००७ अशा तीन वर्षातील तालुक्यात राबविलेल्या विकास योजनांची माहिती मागविली असून ती विस्तृत स्वरूपाची आहे. त्याच्या छायांकित प्रतीसाठी येणाऱ्या खर्चाकरिता अनुदान उपलब्ध नाही, त्यामुळे त्यांनी कार्यालयात येऊन कागदपत्रे पाहिल्यास आवश्यक प्रती उपलब्ध करून देता येतील, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. श्री. पवार यांना आठ दिवसांत माहिती द्यावी, असे आदेश आपण दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर श्री.  यांनी सांगितले.

श्री. पवार यांनी दि. २९.१०.२००७ रोजी अर्ज केला. त्यावर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी उत्तर न दिल्यामुळे दि. ३.१२.२००७ रोजी स्मरणपत्र पाठविले. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी दि. १३.१.२००९ व दि. ६.२.२००९ रोजी काही माहिती दिली. अभिलेख पाहण्यास येण्याबाबतचे पत्र समक्ष देण्याचा प्रयत्न दि. ४.७.२००९ रोजी केला व त्यानंतर दि. ८.७.२००९ रोजी पत्र टपालाने पाठविले. या बाबी लक्षात घेता व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. अपीलकर्त्याने तालुक्यातील विकास कामांची माहिती मागितल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी म्हटले असले तरी प्रत्यक्षात अपीलकर्त्याने फक्त अंदळगावच्या संदर्भातील माहिती मागितली आहे. तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचा तपशील, त्यांच्या रोजनिशीची प्रत इ. बाबींसंबंधी अभिलेख अवलोकन करण्यास कळविण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची कृती योग्य असली तरी मूळ अर्ज केल्यानंतर पावणे-दोन वर्षांनी त्यांनी अपीलकर्त्यास ते कळविले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. गस्ते शास्तीस पात्र ठरतात. शास्तीबाबतचा व केलेल्या कार्यवाही विषयीचा खुलासा त्यांनी आठ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी खुलासा सादर केला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर श्री. अे. टी. बर्डे यांनीही जबाबदारी पार पाडली नाही, म्हणून आयोगाने दि. २१.१०.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना अंतिम मुदत देऊन खुलासा मागविला. दि. ३.११.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. गस्ते यांनी खुलासा सादर केला. तो पाहता विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही त्यांनी केलेली नाही, हे स्पष्ट होते, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

श्री. पवार यांनी दि. २९.१०.२००७ रोजी अर्ज केला. त्यावर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी उत्तर न दिल्यामुळे दि. ३.१२.२००७ रोजी स्मरणपत्र पाठविले. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी दि. १३.१.२००९ व दि. ६.२.२००९ रोजी काही माहिती दिली. अभिलेख पाहण्यास येण्याबाबतचे पत्र समक्ष देण्याचा प्रयत्न दि. ४.७.२००९ रोजी केला व त्यानंतर दि. ८.७.२००९ रोजी पत्र टपालाने पाठविले. या बाबी लक्षात घेता व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. अपीलकर्त्याने तालुक्यातील विकास कामांची माहिती मागितल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी म्हटले असले तरी प्रत्यक्षात अपीलकर्त्याने फक्त अंदळगावच्या संदर्भातील माहिती मागितली आहे. तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचा तपशील, त्यांच्या रोजनिशीची प्रत इ. बाबींसंबंधी अभिलेख अवलोकन करण्यास कळविण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची कृती योग्य असली तरी मूळ अर्ज केल्यानंतर पावणे-दोन वर्षांनी त्यांनी अपीलकर्त्यास ते कळविले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. गस्ते शास्तीस पात्र ठरतात. शास्तीबाबतचा व केलेल्या कार्यवाही विषयीचा खुलासा त्यांनी आठ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी खुलासा सादर केला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर श्री. अे. टी. बर्डे यांनीही जबाबदारी पार पाडली नाही, म्हणून आयोगाने दि. २१.१०.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना अंतिम मुदत देऊन खुलासा मागविला. दि. ३.११.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. गस्ते यांनी खुलासा सादर केला. तो पाहता विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही त्यांनी केलेली नाही, हे स्पष्ट होते, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाच्या कार्यवाहीनुसार विहित मुदतीत खुलासा करून घेण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी श्री. ए. टी. बर्डे यांनी पार पाडलेली नाही, ही बाब गंभीर आहे. याबाबत त्यांना समज देण्यात येत असून त्यांनी खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांना रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम मार्च, एप्रिल व मे २०१० - मध्ये देय असणाऱ्या फेब्रुवारी, मार्च व एप्रिल, २०१० च्या वेतनातून तीन समान हप्त्यात वसूल करून ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर यांनी करावी.

३. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर यांनी आयोगाच्या मौखिक आदेशानुसार कार्यवाही न केल्याबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई का करू नये, याबाबतचा लेखी खुलासा दि. २८.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. ०९.२.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. प्रदिप भागवत गायकवाड
मु. पो. रिधोरे,
ता. माढा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सचिव,
रयत शिक्षण संस्था,
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याध्यापक,
न्यु इंग्लिश स्कूल, रिधोरे,
ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२२ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.८.२००७ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मोजणी करून अतिक्रमण काढणे व रोजगार हमी योजनेच्या रस्त्याबद्दल बॉंड प्रमाणे जागा सोडणे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अतिक्रमण काढणे' ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही, 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार मुख्याध्यापक, न्यु इंग्लिश स्कूल, रिधोरे

यांनी सरकारी मोजणी करून घेतली असून त्याचा नकाशा दि. ४.५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्ते श्री.गायकवाड यांना पाठविला असून त्याची प्रत आयोगास सादर केली आहे.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. शिवाजी हणमंत सुगरे
सलगर वस्ती, डोणगांव रोड,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी(माध्य),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
मोनेश्वर कन्नड प्रशाला,
श्रमजिवी, निलमनगर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७.०७.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१.०८.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.०१.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.०१.२००८ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी दि.२२.०१.२००८ रोजी मुख्याध्यापक, मोनेश्वर कन्नड प्रशाला यांना पत्र लिहून दि. ३१.०१.२००८ पर्यंत माहिती समक्ष घेऊन जातो,असे कळवून सुध्दा माहिती समक्ष जाऊन घेतली नाही, तसेच माहितीसाठीचे शुल्क देखील पूर्णपणे भरले नाही, त्यामुळे अपीलकर्त्याच्या तक्रारीत

तथ्य नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. ०८.१०.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रात नमूद केलेले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे,
दि. 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.शाम शिवराम बाबर
मु.पो.वाठार स्टेशन, ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८९ / सातारा /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.शाम शिवराम बाबर
मु.पो.वाठार स्टेशन, ता.कोरेगाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.स.या.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.सु.रा.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.६.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.७.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या भूखंडाची प्रत्यक्ष मोजणीप्रमाणे झालेल्या क्षेत्रफळाप्रमाणे नोंद न करता चुकीची नोंद केली आहे. त्याबातची माहिती विहित मुदतीत दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.शाम शिवराम बाबर यांनी केली.

श्री.बाबर यांची मुख्य तक्रार क्षेत्रफळ दुरूस्तीची असून त्यासाठी त्यांनी फेरमोजणीसाठी आवश्यक शुल्क भरावे व त्यानंतर मोजणीअंती पुढील कार्यवाही करता येईल, असे त्यांना वेळोवेळी समक्ष व पत्राने कळविले. यापूर्वी याच संदर्भात माहिती मागणारे चार अर्ज त्यांनी केले आहेत. त्या त्या वेळी माहिती देण्यात आली. जागेवर मोजमापे घेऊन आलेल्या क्षेत्रफळाप्रमाणे कजाप करून पाठविलेला आहे. त्या दुरूस्तीच्या मागणीसाठी त्यांनी फेरमोजणी आदी प्रक्रिया पूर्ण करून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.सु.रा.पाटील यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र त्या संदर्भातील माहिती देण्याबाबतची व प्रशासकीय कार्यवाहीही जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा यांनी केलेली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.२.२०१०